
जनरल वॉशिंग्टनसाठी

बटण





जनरल वॉशिंग्टनसाठी बटण

मराठी : अश्विनी बर्वे

लेखकाची नोट

अमेरिकेच्या स्वतंत्र संग्रामात गुप्तचरांची भूमिका खूप महत्वपूर्ण होती. अमेरिकन गुप्तचर जनरल जॉर्ज वाशिंगटनला ब्रिटिश सेना आणि त्याची स्थिती आणि त्यांच्या रसदी विषयी माहिती देत असत. ते नेहमी माहित करून घेत की ब्रिटिश सेना केव्हा आणि कुठे आक्रमण करणार आहे.

१७७७ च्या शरद ऋतु मध्ये जनरल हाउच्या अधिकाराखाली की ब्रिटिश सेनेने फ़िलाडेल्फ़ियावर कब्ज़ा केला होता. डैर्रा परिवार ब्रिटिश सेनेच्या मुख्यालया समोर राहत होता. ते क्वेकर होते आणि खूप विनम्र लोक होते. ते एक-दुसऱ्याशी खूप सन्मानाने बोलत असत. साधारण कपडे घालत असत आणि हिंसेचा विरोध करत असत. त्यांची अपेक्षा अशी होती की युद्धात त्यांनी कोणाच्याही बाजूने भाग घेवू नाही. पण परिवारातला मोठा मुलगा, चार्ल्स, जनरल वॉशिंग्टनची सेनेमध्ये भरती झाला होता. परिवारातले अन्य सदस्य त्याच्या सुरक्षेच्या हेतूने हेरगिरी करू लागले होते.

मिस्टर डैर्रा एक अध्यापक होते. गुप्त संदेश पाठवण्यासाठी त्यांनी एक गुप्त भाषा तयार केली होती. मिसेस डैर्रा जी या परिवाराची सगळ्यात प्रसिद्ध गुप्तहेर झाली, जॉनच्या कोटाच्या बटणांमध्ये गुप्त संदेश लपवत असे. चौदा वर्षीय जॉन ते संदेश जनरल वॅशिंग्टनच्या टोपीमधून घेवून जात असे, जिथं चार्ल्स ते डिकोड करून वाचत असे.

या कहाणीत हे सांगितलं आहे की अशाच एका खतरनाक कामगिरीच्या दरम्यान हेरगिरी करत असतांना जॉनच्या बरोबर काय होवू शकले असते.

“रस्त्यात कोणी सैनिक आहे का? जॉन?” त्याच्या आईने विचारलं.

“फक्त जनरल हाउच्या मुख्यालयाचा एक सैनिक,” त्याने उत्तर दिलं.

“जॉन, लक्षात ठेव.ब्रिटिश सैनिकांपासून जपून रहायचं आहे,” त्याची आई म्हणाली..

“आणि त्याच रस्त्याने जा जो मी तुला सांगितला आहे.”

“पण मला एक छोटा रस्ता माहित आहे,” जॉन म्हणाला.

“तुझी आई जसं सांगते आहे तसं कर,” त्याचे वडील म्हणाले.

“आईने आधीही जनरल वॅशिंग्टनला संदेश पाठवले आहे.”



जॉनने डोकं हलवून सहमती दाखवली. त्याला वाटत होतं की आईने त्याच्या कोटला बटण लवकर लावावं. तो थोडा घाबरला होता आणि त्याला जनरल वॅशिंग्टनच्या कॅम्पकडे लवकर जायचे होते.





“हे घे, जॉन,” आईने शेवटी म्हटले.

“नवीन बटण एकदम जुन्या बटणासारखे दिसते आहे.” जॉनने आपला कोट घेतला.

कपड्याने झाकलेल्या बटणाला त्याने बोटाने स्पर्श केला. बटणाचे छोटी भोकं त्याला जाणवत होते. त्याला लक्षात येत नव्हता जनरल वॅशिंग्टनचे लिहलेले गुप्त संदेश, जो त्या भोकां मध्ये लपवला होता.

“जर मी पकडला गेलो तर कोणी तो संदेश वाचू शकेल का?” जॉनने विचारलं.

“नाही,” त्याचे वडील म्हणाले.

“मी ते अशा गुप्त भाषेत लिहलं आहे, जे फक्त तुझा भाऊ चार्ल्सच वाचू शकतो.”

“मला असं वाटतं की हे बटण मी स्वतः जनरल वॅशिंग्टनला द्यावं.” जॉन म्हणाला.

“काय माहित एक दिवस तू असं करशील सुद्धा,” त्याची आई म्हणाली.

जॉनने लक्षपूर्वक कोटाची बटणं लावले.

“सावध रहा,” त्याच्या वडिलांनी चेतावणी दिली. “ब्रिटिश सेना अमेरीकी गुप्तहेरांना पकडण्याचा प्रयत्न करत आहे.”



“जर तुला त्यांनी पकडलं तर जेल होवू शकते किंवा त्यापेक्षा सुद्धा काहीतरी वाईट.” त्याची आई म्हणाली. जॉन घाबरून कापत होता..

त्याला माहित होते भाग्यवान गुप्तहेरच जेल मध्ये जाऊ शकतात, नाहीतर सामान्यपणे त्यांना फाशी दिली जाते.

“मी सावध राहिन,” जॉन म्हणाला.

“हा आहे तुझा फ़िलॅडेल्फ़ियातून बाहेर जाण्याचा पास,” आई म्हणाली. “हा तुला ब्रिटिश सैनिकांना दाखवावा लागेल.”





जॉनने पास आपल्या खिशात ठेवला.

सगळं चांगलं होईल या हेतूने जेव्हा त्याने त्या बटणांना हात लावला तेव्हा त्याचे हात थरथरले.

“आम्ही रात्रीच्या जेवणासाठी तुझी वाट बघू,” त्याची आई म्हणाली.

“ईश्वर तुझं कल्याण करेल, जॉन,” त्याचे वडील म्हणाले.



जॉन सेकंड स्ट्रीटवर चालत गेला. तो मार्केट स्ट्रीटच्या बाजूला वळला. ब्रिटिश सैनिक प्रत्येक जागी तैनात होते.



जॉनने विचार केला, ते सर्व इंग्लडला परत जावे.

नगराच्या शेवटी असलेल्या सैनिकांची चौकी जवळ येताच तो हळू चालू लागला.

“हे, यैंकी कामचुकार,” त्याने मागून आवाज ऐकला. जॉन लगेच वळाला.

सॅम्युअल बेकर हाक मारत होता.

सॅम्युअलच्या परिवाराला ब्रिटिश सैनिक चांगले वाटत होते.

त्यांना वाटे की इंग्रजांनी युद्ध जिंकावं.

बेकर परिवार आणि टोरी पार्टीच्या काही लोकांना वाटे की अमेरिका परत ब्रिटिश साम्राज्याचा एक भाग व्हावा.

जॉनला ब्रिटिश सैनिकांची जितकी घृणा वाटे त्यापेक्षा अधिक घृणा तो सॅम्युअलची करत असे.



“आमच्या नवीन सैनिकांना तू पाहिलं का?” सॅम्युअलने त्याला विचारलं.

“तुम्ही अमेरिकन आता कधीच जिंकू शकत नाही. ख्रिसमसच्या आधीच जनरल हाउ वॅशिंग्टनला हरवेल.”

“ते असं करू शकणार नाही,” जॉनने रागात म्हटलं.

“ओह, हो, ते हरवतील,” सॅम्युअल म्हणाला.

“आम्ही ब्रिटिश खूप ताकदवान आहोत.”

जॉन त्याच्यापुढे गेला..

“वाट बघ आणि बघ कोणाचा जय होतो ते,” जॉनने ऊंच आवाजात म्हटलं..

“जेव्हा आम्ही जिंकू तेव्हा तुम्ही इंग्लडला परत जाऊ शकतात.”

“कोण पाठवेल आम्हांला?” सॅम्युअलने त्याला ढकलत म्हटलं.

“मी!” जॉन ओरडला.





जॉन मागे होण्याच्या आतच सॅम्युअलने त्याच्या पोटात जोरात एक बुक्का मारला. जॉन खाली पडला.

“बघ,” सॅम्युअल म्हणाला.

“आम्ही जिंकू.”

सॅम्युअल आकडू पणा करत तिथून निघून गेला.

आपला कोट झटकत जॉन उभा राहिला.

त्याची इच्छा होती की त्याने सॅम्युअलला परत मारावे,पण त्याला माहित होते की त्याने आता मारामारी करायला नको.

याशिवाय त्याला या गोष्टीची जाणीव होती की त्याला जनरल वॅशिंग्टनच्या कॅम्पवर पोहचणे अधिक महत्वाचे आहे.



जॉन सैनिक चौकीवर थांबला.

लाल वर्दीवाल्या एक ब्रिटिश सैनिकाने त्याच्याकडून त्याचा पास घेतला.

सैनिक खूप वेळ पासचे निरिक्षण करत राहिला.

जॉनला चिंता वाटू लागली.

"तू आपल्या मावशीकडे जात आहे का?" सैनिकाने विचारलं.

"हो," जॉनने उत्तर दिलं.

"मला प्रत्येक पासचे लक्षपूर्वक तपासणी करावी लागते," सैनिक म्हणाला.

"इथं काही अमेरिकी गुप्तहेर आहेत. तू तर गुप्तहेर नाही ना?की आहे?" सैनिक हसत म्हणाला.

"ओह, नाही सर," जॉनने लगेच उत्तर दिलं.

"तर मग जा," सैनिक म्हणाला.

"पण लक्षात ठेव, ज्या गुप्तहेरांना आम्ही पकडतो त्यांना फाशी देतो."



परंतु तुम्ही मला पकडू शकणार नाही, आपला पास खिशात ठेवत जॉनने विचार केला.





जॉनला माहित होतं त्याने अति विश्वास दाखवणे योग्य नाही. म्हणून तो पूर्णपणे सावध राहिला आणखीन कोणी ब्रिटिश सैनिक रस्त्यात भेटू नये.

जर त्याने त्याला मावशीच्या घराच्या पुढे जातांना बघितलं तर त्याला शंका येईल की हा एक गुप्तहेर आहे. ते लपवलेला गुप्त संदेश सुद्धा शोधून काढू शकतील.



जॉन अचानक थांबला. त्याने येणाऱ्या घोड्यांचा आवाज ऐकला. त्याने एका खड्डात उडी मारली आणि एका झाडाच्या मागे लपला.




पाच ब्रिटिश सैनिक त्या रस्त्याने येत होते. ते हळूहळू पुढे निघून गेले. ते कोणाला तरी शोधत होते.

सैनिक दूर जाईपर्यंत जॉन लपून वाट बघत राहिला. चांगलंच होईल अशी इच्छा करत त्याने कोटाच्या बटणांन स्पर्श केला. एक बटण गायब होते.

जॉनने ज़मीनीवर प्रत्येक ठिकाणी पाहिलं. त्याला बटण कुठे दिसलं नाही. मग त्याच्या लक्षात आलं की सॅम्युअल बेकरने त्याला बुक्का मारला होता. बटण सैनिक चौकी जवळच पडलं होतं.

जॉन परत फ़िलॅडेल्फ़ियाच्या दिशेने पळू लागला. त्याचा श्वास फुलला होता. त्याला ते बटण शोधायचेच होतं.





तो सैनिक चौकी जवळ येवून थांबला.

त्याने प्रत्येक जागी बटण शोधलं.

"तू इतक्या लवकर परत आला?" जॉन घाबरला. ब्रिटिश सैनिक त्याच्याकडे आला..

"माझं एक बटण हरवलं आहे," जॉन म्हणाला.

"जर मी ते शोधलं नाही तर माझी आई खूप नाराज होईल." सैनिकाने आपला हात पुढे केला.



त्याच्या हातात जॉनचे बटण होते.

"जिथं तुम्ही मुलं मारामारी करत होतात, तिथं सापडलं मला," सैनिक म्हणाला..

बटण घेतांना जॉन खूप कष्टपूर्वक आपले हात थरथरू देत नव्हता. त्याला आशा होती की सैनिकाला बटणाच्या आत लपवलेला संदेश मिळाला नसावा.

"माझं बटण शोधून दिल्याबद्दल आपलं आभार," मागे सरकत जॉन म्हणाला.

"तर आता आपल्या रस्त्याने जा," सैनिक म्हणाला.



जसा तो उभा राहिला,एका हाताने त्याला दाबलं . “तू या जंगलात काय करत आहे?” एकाने कर्कश आवाजात विचारलं. तो काही बोलण्याच्या आत त्या माणसाने जॉनला उलटं फिरवलं. त्याचा सामना एका दाढीवाल्याशी झाला. त्याने बंदूक जॉनवर रोखली.

जॉनने बटण आपल्या खिशाच्या एकदम आत ठेवले. त्याने आकाशाकडे बघितले. दुपार नंतरची वेळ होती. आपल्या आईच्या इशाराविरुद्ध, तो जंगलाच्या मधून जाणाऱ्या छोट्या रस्त्याने जनरल वॅशिंग्टनच्या कॅम्पकडे जाऊ लागला. एक तास चालल्यानंतर विश्रांतीसाठी थांबला. बर्फाच्या झऱ्या मधून त्याने पाणी प्यायले.



जी गोष्ट त्याच्या मनात सगळ्यात आधी आली ती जॉनने सांगून टाकली, “मी शिकार करत होतो.”

“बिना बंदुकीची शिकार करत होता?” माणसाने विचारलं.

“खरंतर मी माझ्या मावशीच्या घरी जात होतो,” जॉनने उत्तर दिलं.

“खरं समजून घेण्यासाठी मी तुझ्याबरोबर येईन,” त्या माणसाने तिखट आवाजात सांगितलं.

“आता चल,” त्याने आदेश दिला.

जॉनला माहित होतं की जर त्याने पळण्याचा प्रयत्न केला तर तो माणूस त्याला गोळी मारेल. ते जंगलातून बराच वेळ चालत राहिले. जॉन थकलेला आणि भुकेला होता.

तो खूप घाबरला होता. तो माणूस त्याला कुठे घेवून जात होता? जर ते ब्रिटिश कॅम्प कडे जात असले तर जॉन काय करू शकणार होता.



शेवटी ते एका मोकळ्या मैदानात आले.

एका कोपऱ्यात एक मोठा, पांढऱ्या रंगाचा तंबू होता.

निळा वेष घातलेले सैनिक त्या मैदानात कवायत करत होते. तो अमेरिकी सैनिकांचा कॅम्प होता.



जॉनने सुटकेचा श्वास घेतला. एकदा त्याची भेट चार्ल्सची झाली की सगळं ठीक होऊन जाईल. “आता तुझ्याकडून खरं समजून घेवू,” तो माणूस जॉनला म्हणाला.



त्याने जॉनला पांढऱ्या तंबूच्या जवळ घेवून गेला.


“माझ्या बरोबर एक गुप्तहेर आहे,” तंबूच्या पहारा करणाऱ्या सैनिकाला त्याने म्हटलं.

“मी याला फ़िलॅडैल्फ़ियाच्या जंगलात संदिग्धपणे फिरतांना पकडलं आहे.”





सैनिक तंबूच्या आत गेला. तो लगेच बाहेर आला. “त्याला आत घेवून ये.” दाढीवाल्याने जॉनला तंबूत आत ढकललं.



“बस बेटा,”

निळा वेष घातलेल्या एका उंच माणसाने म्हटलं.

जॉन लाकडाच्या खुर्चीवर बसला.

“मला असं सांगितलं आहे की तू एक गुप्तहेर आहे,” त्या माणसाने विचारलं.

“गुप्तहेर होण्यासाठी तू अजून खूप लहान आहे. तू कोणासाठी हेरगिरी करतो आहे?”

“जनरल वॅशिंग्टनसाठी,” जॉन म्हणाला.

“मी जॉन डैर्रा आहे.”

चार्ल्स डैर्रा माझा मोठा भाऊ. मी चार्ल्सला आता भेटू शकतो का?” तो माणूस सैनिकाकडे वळला.

“चार्ल्स डैर्राला त्वरित माझ्याकडे पाठवा.”

निळा गणवेश घातलेल्या माणसासमोर जॉन आखडून बसला होता. त्याला वाटलं की चार्ल्स येईपर्यंत एक वर्ष निघून गेलं.



"वडिलांनी गुप्त भाषेत लिहलेला एक संदेश यात आहे."

चार्ल्सने बटणाच्या वरचे कपडा काढला. त्याने संदेश बाहेर काढला आणि तो वाचू लागला.

"हा संदेश आता वाच," उंच माणसाने म्हटलं.

"चार्ल्स असं करू नको," जॉन ओरडला.

"फक्त जनरल वॅशिंग्टनला हा संदेश वाचण्याचा अधिकार आहे."

"अरे जॉन," चार्ल्सने आश्चर्याने म्हटलं.

जॉन हसला.

आता तो सिद्ध करू शकत होता की तो वॅशिंग्टनसाठी हेरगिरी करतो आहे.

"आईने मला पाठवलं.माझ्याजवळ जनरल वॅशिंग्टनसाठी काही संदेश आहे."

जॉनने तुटलेलं बटण आपल्या खिशातून काढलं.



चार्ल्स आपल्या भावावर हसला.

“जॉन, हेच जनरल वॅशिंग्टन आहेत.”

जनरल वॅशिंग्टनने पुढे येवून हात मिळवला.

जॉनने पण त्यांच्याशी हात मिळवला.

“इतक्या मोठ्या वीर देशभक्ताचा हात हातात घेणे गौरवाची गोष्ट आहे,” जनरल म्हणाले.

“धन्यवाद, सर,” जॉन म्हणाला.

“चार्ल्स,” जनरल म्हणाले.

“सगळे संदेश उलगडल्या नंतर मला रिपोर्ट कर.”

एवढं म्हणून जनरल तंबूच्या बाहेर निघून गेले.



चार्ल्स जॉनच्या कोटाचे बटणे काढू लागला.


जॉनला विश्वास बसत नव्हता की त्याची भेट जनरल वॅशिंग्टनशी झाली.

त्याची प्रशंसा करत त्यांनी जे शब्द वॅशिंग्टन यांनी म्हटले होते, ते अजूनही त्याच्या कानात गुंजत होते..

संदेश काढल्यानंतर चार्ल्सने बटण परत जॉनच्या कोटाला शिवून दिले.

“घरी परत जातांना सावध रहा,” चार्ल्स म्हणाला.

“आणि बटण आणण्यासाठी आम्हांलाही तुझी आवशकता आहे.”





चांगलं होण्याच्या हेतुने जॉनने कोटाच्या बटणांना स्पर्श केला.मग कोट घालत तो हसला. “जनरल वॅशिंग्टनच्या सेनेसाठी मी खूप बटणं घेवून येईन.”

अंत